# एम. बी. ए.- करियरची सोनेरी संधी

## (भाग-१)

करिअर निवड हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. चांगले करियर निवडणे हे जीवनातल्या महत्वाच्या निर्णयापैकी घेतलेल्या सर्वात महत्त्वाच्या निर्णयांपैकी एक निर्णय आहे. करियर ही व्यक्तीच्या आयुष्यातील खूप महत्त्वाची गोष्ट आहे. आयुष्याच्या निर्णायक टप्प्यावरती आपण कोणते करिअर निवडतो याचा संपूर्ण जीवनावरती फार मोठा परिणाम होत असतो. पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतरही असे आढळून येते की एक तर विद्यार्थी गोंधळलेले आहेत किंवा त्यांच्या करिअरच्या मार्गाबद्दल अनभिज्ञ आहेत. अजून नक्की त्यांना काय करायचे आहे याबाबतीत अनभिज्ञ आहेत. करिअर निवडताना चांगल्या पगारासह आनंद मिळणेही ही गरजेचे ठरते. जर योग्य वेळी कशामध्ये करियर करायचे हे लक्षात आले तर जीवनाचे ध्येय ठरवता येते. तसेच घेतलेल्या निर्णयाचे स्वयमूल्यांकन करून स्पर्धेमधे टिकून राहण्याकरिता कोणती कौशल्ये आवश्यक आहेत याचा आढावा घेवून ती आत्मसात करता येतात.

करियरच्या निवडीवर व्यक्तिमत्व, ध्येय, दृष्टीकोन, अंत:प्रेरणा, कष्ट करण्याची तयारी, सातत्य, एखाद्या विषयाची आवड, मूल्ये, करिअरची धारणा, कंपनी,सामाजिक-आर्थिक घटक, कौशल्य क्षमता, प्रतिभा, जॉब प्रोफाईल ई. घटक परिणाम करत असतात. त्यांची विश्लेषणात्मक चर्चा होणे हे अत्यंत गरजेचे असते. करियर हा संपूर्ण विद्यार्थ्यांचा व पालकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा व काळजी करण्यास भाग पाडणारा विषय आहे. पदवीनंतर, प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात एक ज्वलंत प्रश्न असतो, 'मी पुढे काय करू? विविध अंडरग्रेजुएट विद्यार्थी त्यांच्या आवडी-निवडी नुसार कुठल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यावा याचे सुरुवातीपासूनच नियोजन करताना आढळून येतात.

बहुतेक विद्यार्थी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर बी.एस.सी., बी.कॉम. बी.ए. बी.बी.ए. बी.एस.एल. पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन, हॉटेल व्यवस्थापन, ट्रॅवल अँड टूरिझम, फॅशन टेक्नॉलॉंजी, इंटेरीयर डिझाइन, स्पर्धा परीक्षा ई. अश्या प्रकारचे पदवीपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करतात. परंतू, त्यानंतर पुढे काय? हा प्रश्न प्रत्येक विद्यार्थ्याला किंबहुना त्यांच्या पालकांनाही पडतो. आज कॉमर्स, ह्युमॅनिटीज, सायन्स शाखेसह इतर अनेक शाखेचे विद्यार्थी सुद्धा एमबीए पदवीस प्रवेश घेताना दिसतात. खरं पाहता, एम.बी.ए. या उच्चशिक्षणामधील पदव्युत्तर पदवी करिता विद्यार्थ्यांचा ओढाही प्रचंड प्रमाणामध्ये दिसून येतो. सध्याचे गतिमान विश्व हे माहिती तंत्रज्ञानावर अवलंबून असलेने व एम.बी.ए. प्रवेश हे ऑनलाइन असलेने त्याबाबतीतील संपूर्ण तांत्रिक माहिती ही राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर विस्तृतपणे उपलब्ध आहे त्यामुळे या तांत्रिक बाबींना बगल देवून व त्या ही पलीकडे जावून ह्या पदव्युत्तर पदवी बद्दल चर्चा करणे व माहिती करून घेणे गरजेचे वाटते. जर एम.बी.ए. यशस्वीपणे पूर्ण करायचे असेल तर त्याची नियोजनबद्ध व सुरुवातीपासूनच तयारी करणे आवश्यक आहे व हीच या लेखाची मध्यवर्ती संकल्पना आहे. एम बी. ए. च्या प्रवेशा करिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य प्रवेश परीक्षा घेते.

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी या पात्रता परीक्षेत चांगले गुण मिळवणे अनिवार्य असते. एमबीए सीईटीसाठी २०२४-२०२५ करिता नोंदणी प्रक्रिया सुरु झालेली आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET Cell) कक्षाकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येते. सीईटी सेलकडून मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (MBA) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

एमबीए सीईटी परीक्षा २०२४ साठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग किंवा भारतीय विद्यापीठांच्या असोसिएशनने मान्यता दिलेल्या कोणत्याही विद्यापीठातून कमीतकमी ५० टक्के गुणांसह पदवी कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. तर, राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५ टक्के गुणांची मर्यादा निश्चित करण्यात आलीय. कोणत्याही शाखेत मान्यता दिलेल्या कोणत्याही विद्यापीठातून पदवीधर झालेल्या पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षेला बसणारे सर्व उमेदवार पात्र असतील.

विद्यार्थ्यानी हे लक्षात घेतले पाहिजे की वैयक्तिक करिअरच्या अपेक्षांशी जुळणारा प्रवाह स्वीकारणे या स्पर्धात्मक युगात अत्यंत गरजेचे आहे कारण अचूक मार्गदर्शनाखाली योग्य त्या इंटर्नशिपसह त्या दिशेने कार्य करणे हे करिअर योग्य दिशेने जाण्याची खात्री असते.

आणखीन एक लोकप्रिय प्रश्न म्हणजे 'बीए नंतर एमबीए करावे का?' हा प्रश्न व्यवस्थापन डोमेनमध्ये करियर बनवण्याची योजना आखत असलेल्या सर्व बीए पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पडत असतो. या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे! वर नमूद केलेप्रमाणे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेसह बीए पदवी पूर्ण केल्यानंतर करियरच्या प्रचंड संधि उपलब्ध आहेत. एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रमुख घटकांव्यतिरिक्त इतर अनेक विषय असे आहेत जसे की सामाजिक विज्ञान, संघटनात्मक वर्तन, भाषाकौशल्य, संवादकौशल्य इ. अनेक विषय असे आहेत ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी मदत होते. 'संकटाला संधी' या उक्ती नुसार या बदलत्या काळा मध्ये सुद्धा विद्यार्थ्यांनी संधी शोधली पाहिजे. खचून न जाता आयुष्याची व पुढील भविष्याचे करियर चे नियोजन हे एम. बी. ए. या ह्या पदवीनंतर असणाऱ्या दोन वर्षांच्या पूर्णवेळ अभ्यासक्रमाची निवड करून आपल्या करिअरला चांगली दिशा देता येते.

२१ व्या शतकामध्ये प्रवेश केलेल्या व आपले आयुष्य व भविष्य व्यवसायाभिमुख पदव्युत्तर पदवीद्वारे व प्रशिक्षणा द्वारे सुरक्षित व उज्वल करू ईच्छिण्यार्‍या सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांना एम.बी.ए. हा उत्तमच नव्हे तर सर्वोत्तम पर्याय आहे. (क्रमश:)

**डॉ. ताहीर स. झारी**

प्र.संचालक,डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज,(एम.बी.ए.), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर)